**कृपया प्रसिध्दीसाठी -** **13 जानेवारी 2009**

## मतदार याद्या प्रसिध्द होणार तरी कधी ? : राम नाईक

**मुंबई, मंगळवार** : नवीन मतदार याद्या 10 जानेवारी रोजी प्रसिध्द होणार अशा जाहिराती करुनही अद्याप त्या प्रसिध्द झालेल्या नाहीत, एवढेच नव्हे तर त्या कधी प्रसिध्द होतील याची अधिकृत माहितीही अद्याप देण्यात आलेली नाही, याकडे माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त श्री.एन्.गोपालस्वामी यांचे लक्ष वेधले आहे. त्याचप्रमाणे अद्यापही मतदार यादीतील लक्षावधी दुबार मतदारांची नावे काढून टाकण्याबाबत काय कारवाई केली आहे याची माहिती देण्यात आलेली नाही असेही श्री.नाईक यांनी आज काढलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना श्री.नाईक म्हणाले, "नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्रात मतदार नोंदणी मोहिम राबविण्यात आली होती. त्यानंतर महाराष्ट्र निवडणूक आयुक्तांनी अंतिम मतदार याद्या 10 जानेवारी रोजी प्रसिध्द होतील असे जाहीर केले होते. तशा जाहिरातीही वृत्तपत्रांतून दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात अजूनही नव्या मतदार याद्या प्रसिध्द झालेल्या नाहित. एवढेच नव्हे तर त्या नेमक्या कधी प्रसिध्द होतील याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळेच नव्या याद्या नेमक्या कधी जाहीर होतील याची नागरिकांना माहिती देण्यात यावी, अशी मागणी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त श्री.एन.गोपालस्वामी यांच्याकडे केली आहे."

त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेल्या दुबार मतदारांच्या नावांची तपासणी करण्याचे आदेश जरी मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिले असले तरी अद्याप त्याबाबतही ठोस कारवाई झालेली नाही असे मत व्यक्त करुन श्री.नाईक म्हणाले, "उत्तर मुंबईच्या मतदार याद्यांमध्ये असलेली 3,80,467 दुबार मतदारांची यादी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निर्देशानुसार महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिका-यांकडे एप्रिल 2008 मध्ये दिली होती. त्यावर छाननी सुरु असल्याचे वेळोवेळी महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिका-यांनी तोंडी सांगितले. परंतु याबाबत नेमकी काय कारवाई सुरु असल्याचे जाणवत नाही." मतदार याद्या जर कोणत्याही क्षणी प्रसिध्द होणार असतील तर या दुबार मतदारांबाबत निवडणूक आयोगाने नेमकी काय कारवाई केली आहे याचीही माहिती देण्यात यावी, तसेच 3,80,467 दुबार असणार नाहीत याची दक्षता घ्यावी, अशी विनंतीही श्री.नाईक यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : मुख्य निवडणूक आयुक्तांना लिहीलेले पत्र.**